क्रमांक: एलआरएच-२६९३/११२०५२/प्र.क्र.८६२४/ग३

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: १६ फेब्रुवारी १९९६

विषय:- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
मौजे मालवणी, तालुका बोरीवली
स.क्र. २६३ पैकी नगर भूमापन क्र. ६-अ पैकी
८००० चौ.मी. जमीन आरोग्यविषयक
उपक्रमासाठी मंजूर करण्याबाबत--

शासन:-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे क्र. ७२/३४/वाशि-४४/२४, दिनांक २५ मार्च १९९४ च्या पत्राच्या अनुषंगाने विचारपूर्वक करण्यात येते की, सोस्वा [सोसायटी फॉर सर्व्हीस टू व्हॉलिंटरी एजन्सी] या संस्थेस ही संस्था राज्यभरात करीत असलेल्या विविध सामाजिक आरोग्य विषयक तथा शैक्षणिक विषयक उपक्रमासाठी [सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये सविस्तर दिला आहे] मौजे मालवणी, तालुका बोरीवली येथील स.क्र. २६३ मधील नगर भूमापन क्र. ६-अ पैकी विकास आराखड्यात सेंटर फॉर इंटिग्रेटेड हेल्थ केअर अॅन्ड हेल्थ ट्रेनिंगसाठी आरक्षित असलेल्या ८००० चौ.मी. क्षेत्राचे मुंबई महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमिनीची विल्हेवाट] नियम १९७१ मधील नियम ५ व ६ अन्वये शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलआरएच-१०२३/७११३४/प्र.क्र. ३४७८/ग६, दिनांक ८.२.१९८३ अन्वये विहित केलेल्या व प्रस्तुत प्रकरणी लागू होणाऱ्या अटी व शर्तीनुसार तसेच शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलआरएच-१०८३/१४२६/प्र.क्र. ३५००/ग६, दिनांक ११ मे १९८४ मधील तरतुदीनुसार त्या जमिनीची दि. १.३.७६ रोजी प्रचलित असलेल्या बाजार भावाच्या २५% किंमतीच्या रकमेवर १५% भुईभाडे आकारून सदरची जमीन ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने नेहमीच्या अटी व शर्तीवर व जिल्हाधिकारी यांना आवश्यक वाटतील अशा इतर अटी व शर्तीवर मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

हे आदेश नगर विकास विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.प्र.क्र. ६०६/०७७-२, दि. २६.५.१९९५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/- वि. वि. आल्हाट
[वि. वि. आल्हाट]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

2172
155/96
III-C
20/2/96
273
WS

प्रति,
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
बी.एम.आर.डी.ए. इमारत,
वान्द्रे (पू.) मुंबई-४०००५१

Scanned by CamScanner

प्रतिलिपी:-

आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई.

जमाबंदी आयुक्त, व भूमि अभिलेख

उपसंचालक भूमी अभिलेख कोंकण प्रदेश, मुंबई

महालेखापाल, महाराष्ट्र मुंबई

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

वित्त विभाग (व्यय-९) मंत्रालय, मुंबई.

निवडनस्ती ज३ कार्यासन, मंत्रालय, मुंबई.

शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्रमांक एलआरएफ-२६८३/
११२०५२/प्र.क्र.४६२४/ग-३, दिनांक १६ फेब्रुवारीचे जोडपत्र "अ".

------

<u>जमिनीच्या वापराचे प्रयोजन:-</u>

१] आरोग्य शिक्षण आणि अशासकीय संस्थांमधील सल्लागार व मार्गदर्शकांना कर्मचा-यांचे [पूर्व शालांत व शालांतर] प्रयोगासाठी स्टाफ प्रशिक्षण व शिक्षण, महिलांचा विकास व आरोग्य यावरील प्राधान्याने तंत्रशिक्षणाच्या पातळीवरील शिक्षण.

२] अशासकीय संस्थांमार्फत तंत्रशिक्षण पातळीवरील खालील विषयावर शिक्षण व प्रशिक्षण.

३] महिला विकास

४] १) एड्स प्रतिबंध व नियंत्रण.
   २) एम.सी.एच. व कुटुंबनियंत्रण
   ३) क्षयरोग प्रतिबंध व नियंत्रण
   ४) कुष्ठरोग प्रतिबंध व नियंत्रण
   ५) अंधत्व निवारण
   ६) इतर अनुषंगिक शैक्षणिक उपक्रम.

३) कायर ऑफिस, स्वयंपाक गृह व उपहारगृह

४] मानव विद्यापीठ प्रकल्प व ग्रंथालय आणि शासकीय शैक्षणिक कार्यक्रम [औद्योगिक प्रमाणपत्र व पदविका कार्यक्रम धरून] याकरिता संलग्न प्रकल्प व कार्यालय.

५] व्हरांडा सामायिक जागा व इतर वापर.

Scanned by CamScanner

क्र. :कार्या-अडी/एस-५८९

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
एम.एम.आर.डी.ए.इमारत,सरा मजला,
वांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दिनांक :- १७/१०/१९९९

वाचा :- शासन महसूल व वन विभाग परिपत्रक/ज्ञापन क्र. एलआरएफ-२६९३/
११९०५३/प्र.क्र.५६३०/ल-३, दिनांक १६ फेब्रुवारी,१९९६.

---

आदेश :-

मौजे मालवणी, तालुका बोरीवली येथील स.क्र. २६३ मधील नगर भूमापन क्र.६३ पैकी विकास आराखड्यांत सेंटर फॉर इंटिग्रेटेड हेल्थ केअर ॲन्ड हेल्थ ट्रेनिंगसाठी आरक्षित असलेल्या ८००० चौ.मी. क्षेत्राचा मुंबई महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमीनीचे/ वितरण] नियम १९७१ मधील नियम ५ व ६ अन्वये शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलआरएफ-१०८३/४११३४/प्र.क्र. ३४०८/ग-६, दिनांक ८.३.१९८३ अन्वये विहित केलेल्या व प्रस्तुत प्रकरणी लागू होणाऱ्या सोबतचे परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार सोबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलआरएफ १०८३/१४९६/प्र.क्र.३०००/ग-६, दिनांक ११ मे, १९८४ मधील तरतुदीनुसार त्या जमीनीची दिनांक १.३.१९७६ रोजी प्रचलित असलेल्या रु.५०/- प्रती चौ.मी. तात्पुरत्या बाजार भावाच्या २५% किंमतीच्या रकमेवर १५% प्रमाणे भुईभाडे रु.१६,३७५/- प्रती वर्षी आकारून सदरची जमीन ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने नेहमीच्या अटी व शर्तीवर संस्था [सोसायटी फॉर सर्विस टू व्हॉलेंटरी एजन्सी] या संस्थेस संस्था राबविणार असलेल्या विविध सामाजिक आरोग्य विषयक तथा शैक्षणिक उपक्रमासाठी मंजूर करण्यांत येत आहे.

संस्थेने त्यांचे दिनांक २२.५.१९९६ रोजीचे हमीपत्राद्वारे शासन ज्या अटी व शर्ती घालील त्या आमच्या संस्थेस मान्य आहेत व जमीनीच्या अंतिम मूल्यांकनानंतर तात्पुरता भाडेपट्टा व अंतिम भाडेपट्टा यामधील फरकाची रक्कम भरण्यास तयार असल्याचे कळविले आहे. जमीनीचा ताबा संस्थेस दिनांक ३१.१.१९९७ रोजी देण्यांत आलेला आहे. तरी याद्वारे आदेश देण्यांत येतो की, प्रस्तुत जमीनीचा ७/१२, गाव नमुना नं.२ सोबत मामलतदार कार्डमध्ये व जमीनीचे इतर अभिलेखात या अनुषंगाने

[कृ.मा.पहा]

Scanned by CamScanner

नोंदी घेण्याचे काम्यात येत पुराव्याच्या दोन-दोन प्रतीसह पुर्तता अहवाल सादर करण्यात यावा.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करीता.

प्रति,

दि हॉटेल... [illegible]
हॉटेलची ओर हॉल्डिंग मॅनेजिंग डायरेक्टर,
[illegible] एअरपोर्ट,"ए" विंग, ... मजला,
सहार ... होटेल,
मुंबई - ४०० ०९९.

प्रत :- तहसिलदार बोरीवली यांच्याकडे जमीन अभिलेखात योग्य त्या नोंदी घेऊन पुर्तता अहवाल सादर करण्यासाठी रवाना. जमीनीचा ताबेपट्टा करून घेतल्याचे अहवाल असे याबाबत अहवालात खुलासा करावा.

प्रत :- नगर भूमापन अधिकारी क्र.१० यांच्याकडे माहिती तसा योग्य त्या कार्यवाई व अहवालासाठी रवाना.

प्रत :- अ.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, यांचे त्याकडील शासन दिनांक १८ फेब्रुवारी,१९८८ अन्वये माहितीसाठी सविनय सादर.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करीता.

[illegible]

-: परिशिष्ट "ब" :-

१) शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय लीजेस देण्यात आलेली जमीन/जमीनीचा भाग किंवा त्यावरील हितसंबंध कोणत्याही प्रकारे अभिहस्तांकित/हस्तांतरित करता येणार नाही. असा अभिहस्तांकनांस/हस्तांतरणास परवानगी नाकारण्याचे किंवा शासनाच्या संपूर्ण स्वेच्छा निर्णयानुसार शासनास योग्य वाटतील अशा शर्ती व अटींवर अधिमूल्य आकारण्याच्या अटीवर परवानगी देण्याचे शासनास स्वातंत्र्य राहील.

२) जमीनीचा वापर, जमीन ज्या प्रयोजनासाठी, मंजूर करण्यात आली आहे त्या प्रयोजनासाठीच, जमीन मंजूर केल्यापासून २ वर्षांत करणे आवश्यक राहील.

३) बांधकामाचे आराखड्यास जिल्हाधिकारी/महानगरपालिका यांची मंजूरी घेऊनच बांधकाम करतांना (जिल्हा डेव्हलपमेंट रूल) विकास नियंत्रण नियमांचे पालन करणे आहे. त्या इमारती बांधण्या नंतर त्या इमारतीचे बांधकामात फेरफार वाढ अगर बदल करतांना जिल्हाधिकारी/शासनाची पूर्व xxxx मंजूरी घेणे आवश्यक राहील.

४) लीजेचे सर्व सर्व नाव,कर्ज, देय, वगैरे सोसायटीकरिता/संस्थेकरिता हुकुमी राहील व त्यामध्ये फेरबदल/बदल करता येणार नाही.

५) लीजेने जमीनीचा ताबा मिळाल्यापासून दोन वर्षांच्या कालावधीत प्रती १००चौ.मी. मागे किमान एक झाडाचे योग्य प्रकारची झाडे लावावीत
क.र व त्यांची काळजी घेण्यात व जोपासना करावी.

६) अटींचा भंग झाल्यास कोणतीही नुकसान भरपाई न देता, जमीन शासनात पुनर्ग्रहीत करता येईल. तथापि, जमीनीचा कोणताही भाग पुनर्ग्रहीत करून आणि/अथवा अधिमूल्य आकारून किंवा अटींचा भंग चालू ठेवण्याबद्दल प्रत्येक दिवसासाठी दंड आकारून, अटीभंग माफ करता येईल असे शासनाचे मत झाल्यास शासनाच्या संपूर्ण स्वेच्छा निर्णयानुसार तसे करण्याचे स्वातंत्र्य शासनास राहील.

७) जमीनीवरील सर्व खाणी, खनिज पदार्थ व दगडखाणी यावरील शासनाचे अधिकार राखून ठेवले असून, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे दगडखाणीचे काम करण्यासाठी व त्याचा शोध घेण्यासाठी सर्व वाजवी सोयीसह त्या जमिनीपर्यंत पोचण्याचे संपूर्ण

...४/-

स्वातंत्र्य शासनास राहील.

८) संस्थेमार्फत रुग्णालय सुरू करण्यात आल्यास, शासकीय रुग्णालयामध्ये जो आकार/फी घेतला जातो/घेतली जाते तितकाच आकार/फी बाह्य रुग्ण विभागातील रुग्णांकडून घेण्यात यावा/यावी.

९) ज्या रुग्णांचे वार्षिक उत्पन्न रु.१८००/- किंवा सार्वजनिक आरोग्य विभाग वेळोवेळी ठरवील त्याप्रमाणे रकमेच्या मर्यादेपेक्षा अधिक नसेल तर अशा रुग्णाला, मग तो बाह्य रुग्ण असो वा अंतर रुग्ण असो फी आकारण्यात येऊ नये.

१०) अ) एकूण खाटांपैकी १५% खाटा विनामूल्य सेवेसाठी रुग्णालयाने उपलब्ध करण्यात व १५% खाटांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेल्या दराने सेवा उपलब्ध करावी. उर्वरित खाटांसाठी किती आकार लावायचा हे ठरविण्याची रुग्णालयांना मुभा राहील.

रुग्णालयांसाठी अनुक्रमे निश्चित वाढ करून मिळाल्यास ज्या खाटा उपलब्ध होतील त्यापैकी १५% खाटा विनामूल्य सेवेसाठी व १५% खाटा सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेल्या दराने उपलब्ध करून देण्यात याव्यात.

१०) ब) संस्थेस सवलतीने शासकीय जमीन दिली असल्याने, त्यांनी बांधलेल्या रुग्णालयातील खाटांचा उपयोग करता यावा म्हणून सरकारी/महानगर-पालिका रुग्णालयातील रुग्णांना तेथे पाठविण्याचा अधिकार शासनास राहील.

११) रुग्णालय हे फायदा मिळविण्यासाठी न चालविता ते फक्त धर्मादाय संस्था म्हणून चालविण्यात यावे. तसेच ते सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० आणि/अथवा मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० अन्वये नोंदीकृत केलेले असावे.

१२) रुग्णालयास केव्हाही भेट देऊन त्यांच्या कामकाजाची तपासणी करण्याचा अधिकार शासनास राहील. तसेच तत्पर आणि कार्यक्षम सेवा रुग्णालया-कडून उपलब्ध करण्याच्या दृष्टीने आणि त्याचे व्यवस्थापन चांगल्याप्रकारे व्हावे या दृष्टीने संस्थेस निर्देश देण्याचा अधिकार शासनास राहील आणि अशा रितीने शासनाने दिलेले निर्देश संस्थेवर बंधनकारक राहतील.

१३) अ) भाडेपट्ट्याचा करारनामा विधी व न्याय विभागाच्या सॉलिसिटर यांच्याकडून तयार केला जाईल. त्याचा संपूर्ण खर्च मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी वगैरे (स्टॅम्प ड्युटी आणि रजिस्ट्रेशन चार्जेस) पट्टेदार संस्थेस भरावा लागेल.

१३) ब) भाडेपट्ट्याचा योग्य तो करारनामा तयार करण्यासाठी रु.५,०००/- किंवा शासन केव्हाही ठरवील ती रक्कम पट्टेदार संस्थेस भरावी लागेल.

१४) रुग्णालयाच्या व्यवस्थापन समितीवर शासनाचा एक प्रतिनिधी घेण्याचा अधिकार शासनास राहील. शासन नियुक्त प्रतिनिधीला मताधिकार देण्यात येणार नाही. परंतु शासनाच्या निर्देशांशी निगडीत अशा बाबींवर निर्णय घेताना शासन नियुक्त प्रतिनिधींच्या मतांचा अनुकूल विचार करण्यात यावा.

१५) पट्टेदार संस्थेस जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे स्थायी स्वरूपाची अनामत म्हणून रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) भरावी लागेल व ही रक्कम भाडेपट्ट्याच्या संपूर्ण कालावधीमध्ये शासनाकडे ठेवली जाईल. वर भाडेपट्ट्याच्या कराराच्या शर्तींचा भंग झाल्यास या स्थायी अनामत रकमेतून शासन अंशत: निश्चित करील ती रक्कम जिल्हाधिकारी जप्त करू शकतील. अशाप्रकारे जप्तीद्वारे कमी होणारी रक्कम पट्टेदाराने त्यास तसे कळविल्यानंतर पंधरा दिवसांत भरणा करून मूळ अनामत रक्कम पुन: स्थापित केली पाहिजे. भाडेपट्ट्यामध्ये शासनाचे जे इतर हक्क आणि उपाययोजना आहेत त्यास कोणत्याही प्रकारची बाधा न येता अनामत रकमेतील रक्कम जप्त करण्याचा शासनाचा अतिरिक्त हक्क राहील.

१६) करार झाल्यानंतरही वर कुठल्या काही अटी व शर्ती घालाव्यात असे शासनास xxxxx वाटल्यास तसे करण्याचे शासनाचे स्वातंत्र्य राहील. आणि अशा शर्ती आणि अटी प्रतिग्रहिता/पट्टेदार यांनी पाळणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

खऱ्याप्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता.

मे९८२९९

क्रमांक : एलआरएफ २६९३/२१९०५२/प्र.क्र. ४६२४/ज-३

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक:- १५-१२-२०००

विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा
मौजे मालवणी, स.नं. २६३ पै. न.भू.क्र. ६ अ पै
येथील सोसायटी फॉर सर्व्हिस टू व्हॉलेंटरी एजन्सी
(सोस्वा) यांना मंजूर केलेली ८००० चौ.मी. जमीन
परत घेण्याबाबत.

ज्ञापन :

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या क्रमांक ७२/३ डी/एल ५८९, दिनांक असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, समक्रमांकाच्या दिनांक १०-११-२००० च्या पत्रास अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक सोसायटी फॉर सर्व्हिस टू व्हॉलेंटरी एजन्सी (सोस्वा) या संस्थेस मौजे मालवणी, १६-२-१९९६ च्या शासन ज्ञापनान्वये ता. बोरीवली, स.नं. २६३ पै. न.भू.क्र. ६ अ पै मधील विकास आराखडयात सेंटर फॉर इंटिग्रेटेड हेल्थ केअर अँड हेल्थ ट्रेनिंगसाठी आरक्षित असलेला ८००० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने मंजूर करण्यात आला आहे. संस्थेस दिनांक ३१-१-१९९७ रोजी मंजूर जमिनीचा ताबा देण्यात आला आहे. आता संस्थेने त्यांच्या दिनांक ३१-५-२००० च्या पत्रान्वये संस्थेस मंजूर केलेली जमीन त्यांना सोईस्कर नसल्याने ती परत घेण्याची शासनास विनंती केली आहे. प्रश्नाधीन जमीन संस्थेच्या ताब्यात असून ती अतिक्रमणरहित आहे. तसेच संस्थेने चालू सालापर्यंतची वार्षिक भुईभाडयाची रक्कम रु. १६,३४४/- पूर्ण भरलेली आहे. या पार्श्वभूमीवर संस्थेची सदर विनंती शासनाच्या विचाराधीन होती.

२. याबाबत शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, सोसायटी फॉर सर्व्हिस टू व्हॉलेंटरी एजन्सी यांना मंजूर केलेल्या मौजे मालवणी, स.नं. २६३ पै, न.भू.क्र. ६ अ पै मधील ८००० चौ.मी. जमिनीबाबत संस्थेस आता स्वारस्य नसल्याने संस्थेस जमीन मंजूर करण्याचे समक्रमांकाचे दिनांक १८-२-१९९६ चे शासन ज्ञापन रद्द करण्यात येत आहे व सदर जमीन संस्थेकडून काढून घेऊन सरकार जमा करण्यात येत आहे.

३. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी आवश्यक ती पुढील कार्यवाही करुन शासनास अनुपालन अहवाल तातडीने सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(शिवाजी पाटणकर)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
वांद्रे(पूर्व), मुंबई - ५१

प्रतिलिपी माहितीसाठी अग्रेषित :-

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण विभाग, मुंबई.
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
५) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर(लेखा व अनुज्ञेयता)
६) सहाय्यक संचालक, नगर रचना, मुंबई
७) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
८) निवडनस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू.) मुंबई-५१


क्र. सी/कार्या-३डी/एल-५८१

दिनांक :- 26/2/2009

वाचा :- १) शासन, महसूल व वन विभाग ज्ञापन क्र.एलआरएफ-२६९३/११९०५२/प्रक्र.४६२४/ज-३, दिनांक १६.२.१९९६

२) इकडील आदेश क्र.सम, दिनांक १७.२.१९९९.

३) शासन, महसूल व वन विभाग ज्ञापन क्र.एलआरएफ-२६९३/११९०५२/प्रक्र.४६२४/ज-३, दि.१५.१२.२०००.

**आदेश :-**

इकडील सम क्रमांकाच्या दिनांक १७.२.१९९९ च्या आदेशान्वये सोसायटी फॉर सर्व्हिस टू व्हॉलेंटरी एजन्सी (सोल्वा) या संस्थेस मौजे मालवणी, तालुका बोरीवली, स.नं.२६३पै., नभूक्र.६अ पै.मधील विकास आराखडयांत सेंटर फॉर इंटिग्रेटेड हेल्थ केअर अँड हेल्थ ट्रेनिंगसाठी आरक्षित असलेला ८०००चौ.मी. क्षेत्राचा भूखंड ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने मंजूर करण्यांत आला आहे. संस्थेस दिनांक ३१.१.१९९७ रोजी मंजूर जमीनीचा ताबा देण्यांत आला आहे. आतां संस्थेने त्यांच्या दि. ३१.५.२००० च्या पत्रान्वये संस्थेस मंजूर केलेली जमीन त्यांना सोईस्कर नसल्याने ती परत घेण्याची शासनांस विनंती केली आहे. प्रश्नाधीन जमीन संस्थेच्या ताब्यात असून ती अतिक्रमणरहीत आहे. तसेच संस्थेने चालू सालापर्यंतची वार्षिक भुईभाडयाची रक्कम रु.१६,३४४/- पूर्ण भरलेली आहे. या पार्श्वभूमीवर सोसायटी फॉर सर्व्हिस टू व्हॉलेंटरी एजन्सी यांना मंजूर केलेल्या मौजे मालवणी स.नं.२६३पै., नभूक्र.६अ पै. मधील ८०००चौ.मी. जमीनीबाबत संस्थेस आता स्वारस्य नसल्याने संस्थेस जमीन मंजूर करण्याचे सम क्रमांकाचे दि.१७.२.१९९९ चे इकडील आदेश रद्द करण्यांत येत आहेत. व सदर जमीन संस्थेकडून काढून घेऊन सरकार जमा करण्यांत येत आहे.

संस्थेने नगर भूमापन अधिकारी बोरीवली/तहसिलदार बोरीवली यांचेकडे सदर जमीनीचा ताबा सुपुर्द करावा.

सही/-

(सी.एस.संगितराव)

जिल्हाधिकारी,

मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,

वरिष्ठ सल्लागार,

सोसायटी फॉर सर्व्हिस टू व्हॉलेंटरी एजन्सी,

१ला मजला, ओल्ड आरएमओज क्वॉटर्स,

के.बी.भाभा हॉस्पिटल,

आर.के.पाटकर रोड, बांद्रा (प),

मुंबई-४०० ०५०.

---2/-

Scanned by CamScanner

प्रत :- नगर भूमापन अधिकारी बोरीवली/तहसिलदार बोरीवली यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस रवाना.

२/- सदरची जमीन संस्थेकडून काढून घेऊन ताब्यात घेण्यांत यावी व ताबेपावती, नकाशासह दोन प्रतीत सादर करावी. तसेच गांवच्या अधिकार योग्य ती दुरुस्ती करून दुरुस्ती अभिलेखासह आपला पुर्तता अहवाल सादर करावा.

प्रत :- मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२./मा.आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता.

स्थळ प्रतिवर जिल्हाधिकारी
यांची सही असे

ISS
27/2/01

प्रमाणि
23/2